# दत्तक आजोबा

खिडकीचा पडदा सरकवून बाहेर नजर टाकली. दूरवर पसरलेली बर्फाची शुभ्रसफेद चादर. . .खिडकीच्या कांचेतून निरखायला लोभस वाटते, पण बाहेर पडल्यावर. . .? या कल्पनेने अंगावर शिरशिरी आली. कानाच्या पाळचा नि नाकाचा शेंडा थंड होऊ लागला. आता साधारण सांत मिनिटांत बसस्टॉप गाठला पाहिजे, नाहीतर महत्त्वाचे लेक्चर चुकायचे, या विचारात स्नो-ज़ॅकेट, स्नो-शूज, स्कार्फ, टोपी, ग्लोव्हज्, दप्तर नि दुपारच्या लंचसाठी डोनट हा प्रचंड ओझं वाटणारा जामानिमा आटोपून बाहेर पडून अपार्टमेन्टच्या दाराला कुलूप घातले. बाल्कनीत जमा झालेल्या बर्फाच्या ढिगाऱ्यातून कसरत करीत जिन्यापर्यंत व जिना उतरून साईडवॉक वर पोहचले. आता पेंग्विन पक्ष्याच्या चालीने या बर्फातून बस-स्टॉप गाठायचा या कल्पनेमुळे ओठ हसण्यासाठी  विलग झाले. तोच 'हाय यूषाआन्टी' ही साद कानी आली. वळून पाहिले तो माझ्या मैत्रीणीची जॅकोची मुलगी एली, शॉपिंगकार्टस् गोळा करून महत्प्रयासाने त्या ढकलीत, ग्रोसरी-शॉपकडे चालली होती. अमेरिकनांच्या, नावाचा शॉर्टफॉर्म करण्याच्या नादापायी एलीझाबेथची झालेली 'एली', तितकेसे बरे न वाटूनही मी तिला 'हाय' म्हटले. एवढ्या सकाळी, अशा जीवघेण्या थंडीत त्या ढकलगाड्या गोळा करण्याचे प्रयोजन विचारले. 'oh ! I want to buy x'mas gift for my grandpa, I need money' असे म्हणून थंडीने लाल झालेले गाल नि ते ओझं ढकलणारी ग्लोव्हज्च्या आतील गारठलेली इवली  बोटे  माझ्यापासून दूर जाऊ लागली.

विद्यापीठाने बांधलेल्या या लहान, लहान अपार्टमेन्टस्मध्ये राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे कार नसे नि मग ग्रोसरीचे ओझे अशा बर्फा-

तून हातात वागवीत घरी परतणे या अवघड कसरतीवरचा सोपा उपाय म्हणून काही विद्यार्थी, ग्रोसरी-शॉपकडे आतल्या आत वस्तू जमा करण्यासाठी उपलब्ध असलेल्या ढकलगाड्या, नजर चुकवून अपार्टमेंट-पर्यंत आणीत व सामान घरात ठेवून त्या गाड्या तेथेच जवळपास टाकून देत. दुकानाचे मालक, लहान मुलांना प्रत्येक गाडीचे १५ सेंटस् देऊन अशा बेजबाबदार विद्यार्थ्यांनी इतस्ततः टाकून दिलेल्या ढकलगाड्या गोळा करून आणायला सांगत. आज सकाळी एलीही तेच काम करीत होती. आठ वर्षांच्या एलीला भेटवस्तू घेण्याची इच्छा आहे ही स्तुत्य गोष्ट असूनही तिला अशा थंडीत या प्रकारचे काम करावे लागावे याचे मनोमन वाईट वाटले. मी ज्या देशातून आले तेथील लहान मुले, लहान मुलां-सारखीच वागतात, लहान मुलांसारखेच बोलतात, रडतात, हट्ट करतात, रूसून बसतात नि मग सशाची वा चिमणीची गोष्ट ऐकत आई, ताई, दादा व आण्णांच्या खांद्यावर मान टाकून निश्चितपणे परीराज्याची स्वप्ने बघत झोपी जातात........ येथील लहान मुलांचा तरी काय दोष ? सामाजिक परिस्थितीने कुटुंबसंस्थेची अशी वाताहात केलीय की, परि-स्थिती, अकाली या मुलांना प्रौढ बनविते ... या विचारांतच बस आली, मी बसमध्ये बसले, बसच्या वेगात माझे विचार एलीच्या नि माझ्या मैत्रिणीच्या जॅकीच्या भोवती केन्द्रीत झाले.

जॅकीची नि माझी पहिली भेट आठवली. आम्ही दोघींनी एकच कोर्स घेतला होता. वर्गात जवळ बसत होतो. एकमेकींना 'हॅलो' म्हणत होतो व सरांनी किती 'बोअर' केले यावर हसतमुखाने चर्चाही करीत होतो. आम्ही दोघी जवळ आलो तो प्रसंग आजही अगदी तसाच नजरेसमोर उभा राहतो. विद्यार्थीदशेत किमान परदेशाततरी, असलेले अपुरे पैसे जपून वापरावे लागत म्हणून मी मशीनमधली ३० सेंटची कॉफी घेण्या-ऐवजी डिपार्टमेन्टच्या ऑफीसमध्ये मिळणारी १० सेंटची कॉफी घेई व ती बरोबर डोनट खाऊन लंच खाल्याचे समाधान मिळवी. एके दिवशी मी कॉफी घेत होते नि जॅकीही आली तिने कॉफीचा कप भरून घेतल्यावर मी तिला माझ्या एका डोनटमधला अर्धा डोनट दिला. 'थँक्स' म्हणून तिने तो घेतला व तिच्या पुढच्या वाक्याने मला उगाचच गलबलून आल्यासारखे

झाले. ती म्हणत होती, 'यूषा आज सकाळपासून प्रथमच मी काहीतरी खाते आहे'. . .कदाचित आमच्या नजरभेटीत माझ्या भावना तिला कळाल्या असाव्यात मग त्या संध्याकाळी लेक्चर्स संपवून परतताना जॅकीने तिची जीवनकहाणी मला सांगितली. . . 'यूषा एलीचा जन्म माझ्या सोळाव्या वर्षी झाला. मी हायस्कूलमध्ये शेवटच्या वर्गात होते. मायकल हा माझा वर्गमित्र नकळत माझा बॉयफ्रेंड बनला. त्याच्या बरोबरच्या डेटस् नुकत्याच फुलू लागलेल्या तारूण्याला धुन्दी आणणाऱ्या ठरू लागल्या, आम्ही लग्न करण्याचेही ठरविले पण त्याआधीच मी आई बनणार हे कठोर सत्य आम्हा दोघांच्या कोवळ्या आयुष्यापुढे उभे ठाकले. मायकल पुढील जबाबदारीला घाबरला व एके दिवशी मला न सांगता कुठेतरी निघून गेला. मी एकाकी झाले. घरी, कुणाला विश्वासात घेऊन सर्व सांगण्याचे धाडस होईना नि मीही घर सोडले. हॉटेलात वेट्रेसचे काम केले.. एलीचा जन्म झाला. नाईट-स्कूलमध्ये जाऊन हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले व अशीच अर्धवेळ नोकरी करीत करीत आज मी एम. ए करते आहे. अपार्टमेंटचे भाडे, माझी फी, आम्हा दोघींचा जेवणाचा खर्च, पुस्तके, औषधे, आजारपणे या साऱ्याला पुरे पडतील इतपत पैसे कधीच नसतात. पण एली समजंस आहे. आमचे जेमतेम भागते. मला वाईट वाटते की, एलीला वडिलांचे सुख मिळाले नाही. आजी-आजोबा, मामा-मामी, काका-काकू, चुलतभावंडे, मामेभावंडे ही नाती व त्यातील माया अनुभवता आली नाही. पाहिलंस यूषा, १६ व्या वर्षीच मी आयुष्याची ही अशी सुरवात केली.लग्नाआधी झालेली मुलगी एकाकी आयुष्य नि एक मोठ्ठे प्रश्नचिन्ह what to do with my life ? पण धीराने परिस्थितीवर मात करणे मला जमले; सगळ्यांना जमतेच असे नाही. अशा अनुभवानंतर कितीतरी मुलींना मी, व्यसनाधीन झालेले वा वेश्याव्यवसायाच्या आहारी गेलेले पाहिले आहे. वनवास होतो तो बिचाऱ्या लहान मुलांचा.'

जॅकीची कहाणी ऐकत मी अंतर्मुख झाले. तिचा निरोप घेतला. तिच्या जिद्दीचे कौतुक वाटले व कुमारी मातांना स्वतःचे मूल मानाने वाढवता येते या स्वातंत्र्याचेही कौतुक वाटले. त्यानंतर मी एलीची 'यूषा आन्टी' बनले. तिला आन्टीचे प्रेम देऊ लागले. जॅकीची काही लेक्चर्स

रात्री ७ तें १० या वेळात असत, तेंव्हा एली माझ्या अपार्टमेंटमध्ये वेळ घालवी, अभ्यास करी, बाहुल्यांशी खेळे, शाळेतल्या गंमतीजमती सांगे.

आज एलीला ढकलगाडचा गोळा करून जाताना पाहिले नि जॅकीचे आयुष्य पुन: डोळचासमोरून गेले.एकच आनंद वाटला की,एलीचे आजोबा बहुधा या ख्रिसमसला तिला भेटणार असतील कारण त्यांना भेटवस्तु घेण्यासाठीच ती पैसे जमवीत होती. जॅकीचे कुटुंबीय तिला पुन: भेटतील यापेक्षा मोलवान कोणती ख्रिसमस-गिफ्ट असणार ? या समाधानात मी होते.

टर्म संपली परीक्षा आटोपल्या, तीन आठवडचांची खिसमसची सुट्टी व पुढच्या टर्मच्या फीसाठी लागणाऱ्या पैशांसाठी सुट्टीतले कामही सुरू झाले. ख्रिसमसची संध्याकाळ उगवली, मी जॅकीसाठी व एलीसाठी घेतलेल्या भेटवस्तु सुंदर कागदात बांधून घेऊन त्यांच्या अपार्टमेंटमध्ये गेले. एलीसाठी तयार केलेला एक छोटासाच पण देखणा ख्रिसमस ट्री कोपऱ्यात स्वागताला उभा होता. जॅकीने जमेल तितके, अपार्टमेंटचे डेको-रेशनही केले होते. आम्ही शुभेच्छांची व भेटवस्तुंची देवाणघेवाण केली मी प्रश्न विचारला, 'जॅकी, एलीचे आजोबा येणार होते ना?'

जॅकी म्हणाली, 'नाही, आम्हीच त्यांच्याकडे जाणार आहोत, त येतेस ?'

एका कुटुंबात ख्रिसमसची संध्याकाळ घालविता येणार व अमेरिकन पद्धतीने साजरा होणारा ख्रिसमस बघता येणार म्हणून मीही उत्साहाने हो म्हणाले. एलीने आजोबांसाठी घेतलेली भेटवस्तु, फुले, ख्रिसमस केकचा तुकडा या वस्तु नीट बांधून घेतल्या व आम्ही निघालो. साधारण १५ मिनिटे चालल्यावर आम्ही युनिव्हर्सिटी चर्चच्या कोपऱ्या-जवळील इमारतीपाशी थांबलो. मला वाटले एली बर्फात चालून थकली असेल म्हणून जरा वेळ थांबायचे असेल पण जॅकीने त्या इमारतीचा मोटा दरवाजा उघडला व त्या दोघींमागून मीही आंत गेले. ... पुढचे दृश्य पाहून माझा स्वत:च्याच डोळचांवर विश्वास बसेना... तो वृद्धाश्रम होता...अनेक वृद्ध स्त्री-पुरुष ख्रिसमस ट्री भोवती बसून ख्रिसमसची गाणी गात होते. त्यांनीच एकमेकांसाठी भेटी आणल्या होत्या. त्यांचे

स्वतःचे आप्तस्वकीय त्यांची भेट घ्यायला आलेले नव्हते, येणार नव्हते. या देशात वृद्ध होणे हा गुन्हा आहे. माझ्या डोळ्यांपुढे युनिव्हर्सिटीच्या कॅफेटेरियात एकटेच बसून थरथरत्या हाताने सूप पिणारे वृद्ध गृहस्थ उभे राहिले. जॅकीचे वडील इतके जवळ असून आतापर्यंत मला कसे कळले नाही ? या प्रश्नाशी माझे मन झगडत होते. एवढ्यात एली धावत आत गेली व व्हीलचेअर ढकलत घेऊन आली. व्हीलचेअरवर ऐंशीच्यापुढील वयाचे अत्यंत वृद्ध गृहस्थ बसले होते. आमच्याजवळ येताच, एलीने उत्साहाने जॅकीच्या हातातील भेटवस्तू त्या वृद्ध गृहस्थांना देऊन त्यांच्या सुरकुतलेल्या गालावर ओठ टेकवून अत्यंत आत्मीयतापूर्ण मुका घेत म्हटले, 'Happy x'mas Grandpa' वृद्धाच्या थकलेल्या चेहऱ्यावर एक आगळे समाधान विलसले व नेत्रातून दोन अश्रुमोती ओघळले. एली आजोबांच्या गळ्यात हात टाकून ख्रिसमसच्या गंमतीजमती सांगत होती नि त्या दृश्याकडे साश्रु नेत्रांनी बघत जॅकी मला सांगत होती...

'यूषा, हे एलीचे दत्तक-आजोबा आहेत. वृद्धांना मदत करण्याच्या Adopt a Grandparent या स्कीममध्ये एलीच्या शाळेतील काही मुलामुलींनी आजी व आजोबा दत्तक घेतले आहेत. ही मुले या दत्तक आजीआजोबांना नियमित भेटायला येतात, त्यांना भेटवस्तु देतात व त्यांच्या आयुष्याचे भयाण एकाकी क्षण काही कालावधीसाठी तरी उजळून टाकतात.'

नकळत माझ्या नेत्रांत आसवांनी गर्दी केली. TAB ( Temporarily Able Bodies ही टर्म आपण कशी शोधली व वृद्धांवरील आपला रिसर्च आता Computer Analysis साठी लागणाऱ्या स्टेजपर्यंत कसा आला आहे हे सांगणारे माझे सर आठवले. ज्यांना करिअरमुळे आई-वडिलांचा पूर्ण विसर पडला होता. रक्ताच्या नात्याला म्हातारपण आले म्हणून सोईस्कररीत्या त्यांना विसरून गेलेल्या 'छोटया' मनाच्या तरूण-तरूणींच्या या छोटया अमेरिकेत, आज मला एक 'मोठ्ठी' अमेरिका दिसली... आणि ती होती ढकलगाडया गोळा करून पैसे जमविणारी व दत्तक आजोबांना भेटवस्तू घेणारी आठ वर्षाची चिमुकली एली. ...आजही ख्रिसमसची संध्याकाळ आली की, डोळ्यासमोर उभी राहते ती व्हीलचेअर ढकलणारी एली आणि तिच्या दत्तक आजोबांच्या डोळ्यात चमकणारे ते समाधान.

♣

– डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर

('अमेरिका किती मोठी ? किती छोटी ?' या कथासंग्रहातून)